CMYK

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 78 ■ रविवार,27 एप्रिल 2025 ■ RNI NO.-2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू. 5

दैनिक
# आरंभ मराठी

arambhmarathi535@gmail.com

### उद्या अंक नाही

दैनिक आरंभ मराठी कार्यालयाला रविवार,दिनांक २७ एप्रिल २०२५ रोजी सुटी असल्याने सोमवार,दिनांक २८ एप्रिल चा अंक प्रसिद्ध होणार नाही,याची वाचक,जाहिरातदार, वितरकांनी नोंद घ्यावी.
– संपादक, दैनिक आरंभ मराठी



**सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनास्थेमुळे पोहनेर रस्त्याची दुरावस्था**

>> सविस्तर वृत्त पान ४

# भैरवनाथांच्या नावानं चांगभलंच्या गजरानं सोनारी नगरी दुमदुमली

## हजारो भाविकांच्या उपस्थितीत पार पडला सोनारी येथील काळभैरवनाथांचा रथोत्सव



**आरंभ मराठी । परंडा**

राज्यातील लाखो भाविकांचे मानाचे श्रध्दा स्थान म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या परंडा तालुक्यातील काळभैरवनाथ सोनारी गावचा शनिवारी (दि.२६) रथोत्सव पार पडला. रथोत्सवात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखोच्या संख्येने भाविक दर्शनासाठी आले होते. महाराष्ट्र,आंध्र प्रदेश, कर्नाटक, गोवा राज्यांतील भाविकांचे कुलदैवत असल्यामुळे भाविकांची मोठी गर्दी झाली होती. श्री भैरवनाथानी राक्षसांचा नाश केला, याचाच आनंदोत्सव म्हणून दरवर्षी श्रीक्षेत्र सोनारी येथे चैत्र वद्य अष्टमीपासून ते त्रयोदशीपर्यंत मोठी यात्रा भरते. या दिवशी रथ ओढण्याचा मान मानकरी लोकांना देण्यात येतो व लाखो भाविक मानाच्या काठ्या व कावडी घेऊन सोनारीत दाखल होतात.

यात्रेची शोभा वाढवण्यासाठी खेळण्याची विविध प्रकारची दुकाने, तसेच विविध प्रकारच्या खवय्यांसाठी हॉटेल्स, पाळणे, झोक्याचा आनंद लाखो भाविक घेताना दिसले. ऐन उन्हाळ्यात चाळीस पार उन्हाचा पारा गेला असला तरी लहान, वयोवृद्धसह महिला लाखोच्या संख्येने सोनारीमध्ये दाखल झाले होते. भाविक मंदिर परिसरात खोबरे व गुलाल भक्तिभावाने उधळतात. प्रशासनाच्या वतीनेही जागोजागी बॅरिकेट्स लावून भाविकांची दर्शनासाठी सोय करण्यात आली होती. यात्रेपूर्वीच घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत प्रशासनाकडून योग्य त्या सूचना देण्यात आल्या होत्या. यात्रेदरम्यान कंट्रोलरूम स्थापन करणे, तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, अतिरिक्त टँकर, असे नियोजन करण्यात आले होते. यासोबतच पोलीस बंदोबस्त, बससेवा, मोक्याच्या ठिकाणी अग्निशमन वाहन, बॅरिकेट्स उभा करण्यात आले होते. महावितरण कंपनीकडून सुरळीत वीज पुरवठा करण्यात आला असून आरोग्यसेवा, सार्वजनिक बांधकाम विभाग व सर्व विभागांना सूचना दिल्या प्रमाणे चोख बंदोबस्त करण्यात आला होता. कोणाला हानी होऊ नये म्हणून रथ ओढताना संपूर्ण चित्रीकरण करण्यात आले, याची काळजी प्रशासनाकडून घेण्यात आली होती. महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, कर्नाटक, गोव्यामधून येणाऱ्या भाविकांच्या भैरोबाच्या नावानं चांगभलं गजराने आजचा रथोत्सव आनंदाने पार पडला.



छायाचित्र– सुखदेव गायके येरमाळा

### मुख्यमंत्र्यांच्या सात कलमी कार्यक्रमात

# धाराशिव जिल्हा परिषद विभागात अव्वल

**■ शंभर दिवसात प्रशासनाने भौतिक सुविधांसह गतिमान कारभारासाठी केले प्रयत्न ■ आता राज्य स्तरावर लागणार कसोटी**

**आरंभ मराठी । धाराशिव**

**नागरी सेवा सुधारण्याबरोबरच प्रशासनाचे कामकाजही अधिक लोकाभिमुख आणि सुलभ व्हावे, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सात कलमी कार्यक्रम राबवण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय दिनांक ७ जानेवारी रोजी घेतला होता. उपक्रमाचे उद्दिष्ट नागरिकांना जलद, पारदर्शक आणि प्रभावी सेवा उपलब्ध करून देणे, तसेच प्रशासनातील कार्यक्षमता आणि स्वच्छता वाढवणे हे होते. धाराशिव जिल्हा परिषदेने या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी केली असून, जिल्हा प्रशासनाने याबाबतीत मराठवाडा विभागात अव्वल क्रमांक पटकावला आहे. जिल्हा परिषद प्रशासनाने या काळात भौतिक सुविधांसह गतिमान प्रशासन राबवून त्याचे परीक्षण करण्यासाठी आलेल्या बाह्य संस्थेसमोर उत्कृष्ट सादरीकरण केले. विभागात अव्वल आलेल्या धाराशिव जिल्हा परिषद प्रशासनाचे राज्यात प्रथम येण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ७ जानेवारी रोजी शंभर दिवसांचा कृती कार्यक्रम जाहीर केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांची पाहणी करून त्यांना सूचना दिल्या होत्या. दिलेल्या सूचनेनुसार सर्व विभागांनी सात कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी जोरात सुरू केली होती. गतिमान आणि पारदर्शी कारभारासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने डॉ. मैनाक घोष यांच्या सूचनेनुसार एक आकृतिबंध तयार करून प्रत्येक कामासाठी टीम निवडल्या होत्या. डॉ. मैनाक घोष दररोज केलेल्या कामांचा आढावा घेत असल्यामुळे यातील प्रत्येक विभागाने प्रामाणिकपणे मेहनत घेतली. त्यातच आर्थिक वर्ष संपत असल्यामुळे कामाची व्याप्ती वाढली होती. त्यामुळे शनिवार आणि रविवारची सुट्टी देखील रद्द करून कर्मचाऱ्यांनी काम केले. नागरिकांच्या मनात प्रशासनाबद्दल आपुलकी आणि विश्वास निर्माण करण्यात धाराशिव जिल्हा परिषद यशस्वी झाली असल्याचे म्हणत तपासणी करण्यासाठी आलेल्या बाह्य यंत्रणेने विभागात पहिला नंबर काढून धाराशिव जिल्हा परिषदेचे कौतुक केले आहे.






### विभागीय आयुक्तांकडे केले सादरीकरण



दिनांक ७ जानेवारी ते १६ एप्रिल या शंभर दिवसात सात कलमी कृती कार्यक्रम राबविण्यात आला. दिनांक १८ एप्रिल रोजी छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्तांसमोर धाराशिव जिल्हा परिषदेने शंभर दिवसात केलेल्या कामाचे सादरीकरण केले. त्यानंतर बाह्य संस्थेमार्फत मूल्यमापन करण्यासाठी रामानंद शुक्ला यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी जिल्हा परिषद धाराशिव येथे आली. या कमिटीसमोर मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी पीपीटी च्या माध्यमातून उत्तम सादरीकरण केले. बाह्य संस्थेला हे सादरीकरण आवडल्यामुळे विभागीय स्तरावर जिल्हा परिषदेने प्रथम क्रमांक पटकावला.

### धाराशिव जिल्हा परिषद अंतिम सहा मध्ये

विभागीय पातळीवर अव्वल ठरलेली धाराशिव जिल्हा परिषद राज्य पातळीवर अंतिम सहा मध्ये पोहोचली आहे. सहा विभागातून अव्वल ठरलेल्या सहा जिल्हा परिषदेतून पहिले तीन क्रमांक काढले जाणार आहेत. राज्य स्तरावर देखील धाराशिव जिल्हा परिषद क्रमांक पटकावेल असा विश्वास मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी व्यक्त केला.

### शंभर दिवसात जिल्हा परिषदेने हे बदल केले

**प्रशासनात सुधारणा**

यंत्रणेतील कार्यक्षमतेत वाढ करून जलद सेवा पुरवण्यावर जिल्हा परिषदेने भर दिला. झिरो पेंडेन्सी राबवताना कामे खोळंबून राहणार नाहीत याची काळजी घेतली.

**स्वच्छता मोहिमा**

संपूर्ण जिल्हा परिषदेच्या इमारतीत स्वच्छता आणि टापटीपपणाला महत्व दिले. स्वच्छतेबरोबरच सुरक्षित वातावरण बनवले. इमारतीत पिण्याच्या पाण्यासह स्वच्छता गृहात पुरेसे सांडपाणी उपलब्ध करून दिले.

**अंतर्गत सुसूत्रता**

जिल्हा परिषदेच्या दोन वेगवेगळ्या विभागात सुसूत्रता वाढवली. त्यामुळे कार्यक्षमतेत वाढ झाली. एका विभागामुळे दुसऱ्या विभागाचे काम अडणार नाही याची काळजी घेतली.

**स्वच्छता मोहिमेवर भर**

सर्व विभागाच्या कार्यालयात स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली. परिसर स्वच्छ करण्याबरोबरच, जुन्या नोंदींचे डिजिटलायझेशन, उपयुक्त नसणाऱ्या वस्तूंचा निचरा व सुरक्षित वातावरण निर्माण करण्यावर भर दिला.

# श्री तुळजाभवानी मंदिरातून ७ संशयितांना ताब्यात

**तीन दिवसापासून मंदिरातील दर्शन मंडपात संशयास्पद वावर, महिलांचाही समावेश, चौकशीनंतर झाली सुटका**

**आरंभ मराठी । तुळजापूर**

कुलस्वामिनी श्री. तुळजाभवानी मातेच्या मंदिरातील दर्शन मंडपाच्या तिसऱ्या मजल्यावर सलग तीन दिवस संशयास्पद हालचाली, संशयास्पद वर्तन करणाऱ्या सात जणांना तुळजापूर पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. यामध्ये महिलांचाही समावेश असून, या व्यक्तींची कसून चौकशी करण्यात येत आहे. वारंवार त्याच ठिकाणी येऊन मंदिरात सलग तीन दिवस संशयास्पद हालचाली करणाऱ्या या सात जणांचा चौकशी करून पोलिसांनी त्यांची सुटका केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, श्री तुळजाभवानी मंदिरात बुधवारी सायंकाळी ५:२७ ते ५:३४ या दरम्यान चार ते पाच व्यक्ती संशयित हालचाली करताना दर्शन मंडपातील तिसऱ्या मजल्यावरील प्रवेशद्वारावर सुरक्षारक्षक शिवाजी उमाप, सुरक्षा फील्ड ऑफिसर बिभिषण माने व सुरक्षा विभाग प्रोजेक्ट मॅनेजर संग्राम पाटील यांना राऊंड चेकिंगला जात असताना आढळून आल्या. सुरक्षा रक्षकांनी त्या संशयित व्यक्तींची चौकशी केली असता ते फिरवा फिरविची उत्तरे देऊ लागले. सुरक्षा अधिकाऱ्यांनी त्यांना तुम्ही इथे थांबू नका, दर्शन झाले असेल तर तात्काळ मंदिर परिसराबाहेर जा, असे सांगितले व दोन सुरक्षा रक्षक त्यांच्यावरती लक्ष ठेवण्यासाठी पाठवले. त्या संशयित व्यक्ती धर्मदर्शन रांगेतून दर्शनासाठी गेल्या. त्यानंतर गुरुवारी दुपारी ३:४० ते ३:४६ या दरम्यान पुन्हा एकदा त्याच संशयित व्यक्ती दर्शन मंडपातील तिसऱ्या मजल्याच्या प्रवेशद्वाराला आढळून आल्या. यावेळी सुरक्षा विभाग फील्ड ऑफिसर बिभीषण माने, चे सुरक्षा निरीक्षक कमलाकर पवार व सुरक्षा रक्षक शिवाजी उमाप हे राऊंड चेकिंगला जात असताना संशयित व्यक्ती निदर्शनास आल्या.कमलाकर पवार यांनी त्यांना हटकले व तुम्ही इथे कशाला थांबला आहात,असे विचारून त्यांची ओळख विचारली असता ते फिरवाफिरवीची उत्तरे देऊ लागले. त्यांना तेथे थांबू नका, मंदिराच्या बाहेर जा असे सांगितले व तत्काळ ही माहिती मंदिर पोलिस चौकीचे सहायक पोलीस निरीक्षक अर्जुन चौधर व पोलीस कर्मचारी सोनटक्के यांना देण्यात आली.मात्र, तिसऱ्या दिवशी म्हणजे शुक्रवारी सायंकाळी पुन्हा ४:५२ ते ५:०६ या दरम्यान मंदिर परिसरात त्याच संशयित व्यक्ती निदर्शनास आल्या. यानंतर चार सुरक्षा रक्षकांच्या मदतीने या संशयित व्यक्तींना प्रथम मंदिर पोलिस चौकी येथे नेण्यात आले.त्यानंतर मंदिर पोलिस चौकी पोलिसांच्या सूचनेनुसार त्या संशयित व्यक्तींना तुळजापूर शहर पोलिस चौकी येथे नेण्यात आले. तेथे त्या ७ संशयित व्यक्तींना पुढील कारवाईसाठी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या व्यक्तींचा मंदिर परिसरात संशयास्पद वावर असल्याने खळबळ उडाली आहे. पोलिसांनी त्यांची कसून चौकशी सुरू केली असून, चौकशीनंतर नेमका प्रकार समोर येईल.

## तेर येथील सबस्टेशन परिसरात स्पार्किंगमुळे आग

### अग्निशमन दलाने वेळेत आग विझवल्यामुळे अनर्थ टळला



**आरंभ मराठी । तेर**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या ३३ के.व्ही सबस्टेशन परिसरात स्पार्किंगमुळे लागलेल्या आगीत परीसरातील गवत जळून खाक झाले. शुक्रवारी (दि.२५) सायंकाळी तारांची ठिणगी पडून आग लागल्याचे सांगितले जात आहे . परिसरात सर्वत्र वाळलेले गवत असल्याने या गवताने काही वेळातच पेट घेतला. संत गोरोबाकाका यात्रेसाठी भाविकांच्या सुरक्षेसाठी आलेल्या कळंब येथील अग्नीशमन दलाच्या बंबानी ही आग विझवली आणि अनर्थ टळला. हा बंब जर नसता तर आग सर्वत्र पसरून मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती. गेल्या एक महिन्यापासून महावितरण कंपनीच्या परिसरात आग लागण्याची ही दुसरी घटना आहे. गेल्या महिन्यात लागलेल्या आगीत महावितरणची जीप जळून राख झाली होती. या दोन घटनेमुळे महावितरणच्या संवेदनशील परिसराची सुरक्षा रामभरोसे झाली आहे.

## भोसले हायस्कूलची खो खो खेळाडू तन्वी भोसले राणी लक्ष्मीबाई पुरस्काराने सन्मानित



**आरंभ मराठी । धाराशिव**

ओरिसा राज्यातील जगन्नाथ पुरी या ठिकाणी झालेल्या वरिष्ठ राष्ट्रीय खो –खो स्पर्धेत श्रीपतराव भोसले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील कला शाखेतील इयत्ता बारावीमध्ये शिकणारी तन्वी युवराज भोसले हिला भारतातील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून दिल्या जाणाऱ्या ''राणी लक्ष्मीबाई '' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराबद्दल प्रशिक्षक प्रवीण बागल, अभिजित पाटील, विवेक कापसे यांचे आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुधीर पाटील, महाराष्ट्र खो–खो असोसिएशनचे सरचिटणीस प्राध्यापक डॉ. चंद्रजीत जाधव, संस्थेच्या सरचिटणीस सौ. प्रेमाताई सुधीर पाटील, प्रशासकीय अधिकारी आदित्य पाटील, प्राचार्य एन.आर.नन्नवरे व उपप्राचार्य संतोष घार्गे, उपमुख्याध्यापक प्रमोद कदम व पर्यवेक्षक यशवंत इंगळे, श्रीमती बी.बी. गुंड, सुनील कोरडे, राजेंद्र जाधव, निखिलकुमार गोरे, धनंजय देशमुख, प्रा. मोहन शिंदे, प्रा .विनोद आंबेवाडीकर यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## संत शिरोमणी गोरोबाकाकांच्या पुण्यतिथीनिमित्त गुलाल व फुलांची उधळण

**समाधीस मानाच्या अभिषेक पुजा**

**आरंभ मराठी । तेर**

प्रति पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या धाराशिव तालुक्यातील तेर येथील थोर संत, संत परीक्षक गोरोबाकाका यांच्या पुण्यतिथीनिमित्त शनिवारी (दि.२६) काकाच्या समाधी मंदीरात ह.भ.प.दत्तात्रय महाराज अंबिरकर यांचे गुलालाचे किर्तन पार पडले. यावेळी काकाच्या समाधी समोरील मंडपात गुलालाची व फुलांची उधळण करण्यात आली. संत गोरोबाकाकाच्या सोहळ्यात सहभागी झालेल्या ह.भ.प. थोबडे महाराज, ह.भ.प.राशिनकर महाराज, ह.भ.प.कबीरदास महाराज, भाऊसाहेब महाराज गोसावी, संत गोराबाकाका मंदिराचे पुजारी रघुनंदन महाराज पुजारी, चिखलीकर महाराज यांच्या फडाच्या वतीने गोरोबाकाकाच्या समाधीस अभिषेक पुजा करण्यात आली. यासाठी मंदिराच्या गाभाऱ्यात मोठी गर्दी झाली होती. समाधी सोहळ्यानिमित्त.ह.भ.प.दत्तात्रय महाराज अंबिरकर यांचे गुलालाचे किर्तन होऊन फुलांची उधळण करण्यात आली.

वार्षिक समाधी सोहळ्यात सहभागी झालेल्या दिंडी, पालखी फडावरही पुण्यतिथीनिमित्त गुलालाचे किर्तन होऊन पुण्यतिथी साजरी करण्यात येऊन महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. बहुतांश दिंड्या व पालख्या काल परत फिरल्या आहेत. आज (दि.२७) नृसिंह मंदिरात हजेरी किर्तन होईल. त्यानंतर गोपाळकाला होणार आहे. तर दुपारी ग्रामपंचायतीच्या वतीने कुस्तीचे जंगी सामने रंगणार असून त्यानंतर समाधी सोहळ्याची सांगता होणार आहे.

# पाळीव प्राण्यांसाठी प्रत्येक शहरात स्मशानभूमी

**पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या मागणीला यश, शासनाचा निर्णय**

---------------

**घनकचरा व्यवस्थापन केंद्राच्या शेजारी करावी लागणार स्मशानभूमी**

**आरंभ मराठी । धाराशिव**

राज्याचे परिवहन मंत्री आणि धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या दीड वर्षांपासून सुरू असलेल्या प्रयत्नांना यश आले असून, यापुढे राज्यात पाळीव जनावरांना देखील हक्काची स्मशानभूमी मिळणार आहे. यासंबधीचा शासननिर्णय राज्य सरकारने शुक्रवारी (दि.२५) जाहीर केला आहे. प्राण्यांच्या अंत्यसंस्कारासाठी स्मशानभूमीची व्यवस्था करण्याची मागणी प्रताप सरनाईक यांनी दिनांक २५ जुलै २०२३ रोजी पावसाळी अधिवेशनात औचित्याच्या मुद्द्यावर बोलताना केली होती. याच मागणीची दखल राज्य सरकारने घेतली असून, नगरविकास विभागाने याबाबत शासन आदेश काढला आहे. नगर विकास विभागाने स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या घनकचरा व्यवस्थापन केंद्राच्या शेजारील जागा पाळीव जनावरांच्या स्मशानभूमीसाठी उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत. कुत्रा, मांजर, पांढरे उंदीर यासारख्या पाळीव प्राण्यांवर यामुळे अंत्यविधी करता येणार आहे. कुत्रे, मांजर यांच्यासह इतर गोवंशीय पाळीव प्राण्यांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांना रस्त्यावरच टाकले जाते. मृत्यूनंतर या प्राण्यांच्या शरीराची योग्य विल्हेवाट न केल्यास दुर्गंधी पसरून रोगराई पसरण्याचा धोका असतो. त्यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते. या पार्श्वभूमीवर घनकचरा व्यवस्थापन केंद्राच्या शेजारी पाळीव प्राण्याच्या अंत्यविधीसाठी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी सूचना नगरविकास विभागाने दिली आहे. तसेच यासंदर्भात मार्गदर्शक सूचना आखल्या असून, त्यांची अंमलबजावणी राज्यातील सर्व महानगरपालिका, नगर परिषदा, नगरपंचायती यांनी करावी लागणार आहे.



### या आहेत मार्गदर्शक सूचना


राज्यातील सर्व महापालिका, नगर परिषदा, नगरपंचायती यांनी अंत्यविधीसाठी दिलेल्या जागेला संरक्षक भिंत बांधून सुरक्षा व्यवस्था पुरवावी. मृत प्राण्यांचे अंत्यविधी करताना योग्य ती दक्षता घ्यावी. त्यातून दुर्गंधी निर्माण होणार नाही, इतर आजार पसरणार नाहीत, याची काळजी घ्यावी. मृत पाळीव प्राणी इतर ठिकाणी टाकले जाणार नाही, याची दक्षता घ्यावी. ठराविक शुल्क आकारुन पाळीव प्राण्यांच्या अंत्यविधीसाठी परवानगी द्यावी अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

CMYK

## दहशतवादाविरुद्ध सर्व राष्ट्रांनी एकत्र यावे

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात २८ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला. या हल्ल्याने भारतातच नव्हे जगभर जगभर खळबळ माजली. या हल्ल्याची जशी भारतात निंदा होत आहे तशीच निंदा जगभर होत आहे. संपूर्ण जग या भ्याड हल्ल्याने हादरून गेले आहे. जगाला हादरवून सोडणाऱ्या या घटनेचे तीव्र पडसाद उमटले आहेत. भारताने दहशतवाद्यांची कोंडी करण्यासाठी ठोस पावले उचलली आहेत. इतकेच नाही तर या हल्ल्यास ठोस प्रतिउत्तर देण्याची तयारीही भारताने सुरू केली आहे. जर भारताने या हल्ल्यास जशास तसे उत्तर दिले आणि दहशतवाद्यांचे अड्डे असलेल्या पाकव्याप्त काश्मीरमध्ये सैन्य घुसवले किंवा सार्जिकल स्ट्राईक केला तर जग भारताच्या बाजूने उभे राहील का ? भारताच्या कारवाईला जगाचा पाठिंबा मिळेल का ? असा प्रश्न विचारला जात आहे जर भारताने दहशतवाद्यांविरोधात कारवाई केली तर भारताला जगाचा पाठिंबा निश्चितपणे मिळेल कारण दहशतवादाने फक्त भारतच नाही तर सारे जग पोळून निघाले आहे. केवळ भारतच नाही जगातील सर्वच प्रमुख देशांना दहशतवादाने ग्रासले आहे. सर्व प्रमुख देशांत दहशतवाद्यांनी केंव्हांना केंव्हा हल्ला केला आहे. मागील वर्षीच रशियाच्या मॉस्को शहरात दहशतवाद्यांनी मोठा हल्ला घडवून आणला होता. रशियाच्या निवडणुकीत पुतीन यांचा एकतर्फी विजय झाल्याच्या काही तासातच रशियाची राजधानी असलेल्या मॉस्को शहरात मोठा दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्यात रशियाच्या १३३ निरपराध नागरिकांना जीव गमवावा लागला होता. या हल्ल्यात हजारो नागरिक जखमी झाले होते. इसीस या दहशतवादी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली होती. पुतीन यांनी पाचव्यांदा विजय मिळवताच दहशतवाद्यांनी त्यांना ही भेट दिली होती. रशियात झालेला या भीषण हल्ल्याने संपूर्ण जगात चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते कारण इसीसच्या दहशतवाद्यांनी थेट मॉस्को शहरात घुसून हा हल्ला केला होता. रशियाच्या पोलादी सुरक्षेला भेदून दहशतवाद्यांनी हा हल्ला केल्याने रशियाच्या सुरक्षेव्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते जर राशिया सारख्या अभेद्य सुरक्षा व्यवस्था असलेल्या देशात इतका मोठा दहशतवादी हल्ला होऊ शकतो तर मग जगातील कोणत्याची देशात घुसून दहशतवादी हल्ला करू शकतात अशीच चर्चा जगभर होऊ लागली होती आणि त्याची प्रचिती अवघ्या वर्षभरात आली. पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी भारतीय हद्दीत घुसून भारतीय पर्यटकांना ठार केले. वर्षभराच्या अंतरात जगातील प्रमुख देश असलेल्या या दोन्ही देशात झालेल्या या दहशतवादी हल्ल्यांनी जगभर भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जगात दहशतवाद पुन्हा डोके वर काढत आहे हेच या हल्ल्याने सिद्ध होत आहे अर्थात दहशतवाद्यांनी आताच हल्ले सुरू केले आहेत असे नाही . या आधीही दहशतवाद्यांनी अनेक देशात दहशतवादी हल्ले केले आहेत. भारत तर नेहमीच दहशतवाद्यांच्या हिट लिस्टवर राहिला आहे. दहशतवादाची सर्वाधिक झळ भारतालाच बसली आहे. दहशतवादामुळे भारताने दोन पंतप्रधान गमावले आहेत. भारतावर झालेला २६ / ११ चा दहशतवादी हल्ला तर संपूर्ण जगाने पहिला आहे. भारताला जेंव्हा जेंव्हा दहशतवादाची झळ बसली तेंव्हा तेंव्हा संपूर्ण जगाने एकत्र येऊन दहशतवादाचा मुकाबला करावा असे आव्हान भारताने जगाला केले मात्र जगाने त्याला प्रतिसाद दिला नाही त्यामुळे दहशतवाद्यांचे धारिष्ट्य वाढत गेले. दहशतवाद्यांनी केवळ भारतालाच नाही तर अमेरिकेसारख्या महासत्तेला देखील तडाखा दिला आहे. भारत, रशिया, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, स्पेन, इस्राईल, जपान, दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलिया इतकेच नाही तर पाकिस्तानला देखील दहशतवादाची झळ बसली आहे. मध्यंतरी काही काळ शांत असलेले दहशतवादी आता पुन्हा एकदा सक्रिय झाले आहेत. दहशतवादी सर्वच देशात दहशतवादी कारवाया करीत आहे. त्यामुळे दहशतवाद ही आता एका देशाची समस्या राहिली नसून ती वैश्विक समस्या बनली आहे. दहशतवादापासून कोणताच देश अलिप्त राहू शकत नाही. त्यामुळे याचा मुकाबला सर्व देशांनी मिळून करायला हवा. भारताने दहशतवादाविरोधात कारवाई केली तर संपूर्ण जगाने भारताने पाठिंबा द्यायला हवा. दहशतवादा विरोधातील भारताच्या मोहिमेस जगाने पाठबळ द्यावे. दहशतवादा विरोधात संपूर्ण जगाने एक व्हायला हवे. जोवर दहशतवादाविरोधात संपूर्ण विश्व एक होत नाही तोवर दहशतवादाचा हा भस्मासूर रोखणे कठीण आहे. दहशतवादी म्हणजे मानवतेचे शत्रू आहेत. या शत्रूविरुद्ध लढण्यासाठी सर्व राष्ट्रांनी एक होणे ही काळाची गरज आहे.

# सनातन्यांशी झुंजणारा योद्धा वारकरी




दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेले पंढरपूर हे तिर्थक्षेत्र सनातन्यांचा अड्डा म्हणूनदेखील ओळखले जायचे.एकेकाळी पंढरपूरातल्या विठ्ठलरखुमाईंच्या पुजाऱ्यांची म्हणजेच बडवे आणि उत्पातांची मंदिरात प्रचंड एकाधिकारशाही चालत होती.संत चोखामेळा यांचे तर बडवे मंदिरात येऊ देत नाहीत,मारहाण करतात अशी तक्रार करणारे अभंगसुद्धा उपलब्ध आहेत. मंदिराचे सर्वे सर्वा होऊन बसलेल्या बडव्यांची मुजोरी कालांतराने कमी होत गेली आणि सामान्य वारकऱ्यांना मंदिर परिसरात मोकळा श्वास घेता येऊ लागला.यामागे पंढरपूरातील परिवर्तनवादी चळवळीतील समाजधुरीणांची अविरत संघर्षाची भूमिका प्रामुख्याने कारणीभूत आहे. त्याचबरोबर त्यांनी सामान्य वारकऱ्यांमध्ये केलेली जागृती तसेच महाराष्ट्र शासनाला मंदिर प्रशासनात लक्ष घालण्यास भाग पाडणे अशा गोष्टींचा सुद्धा सकारात्मक परिणाम आज आपणांस पंढरपूर विठ्ठल मंदिर व परिसरात पाहायला मिळतो. आता तर तिथे बडव्यांची मंदिरातली मक्तेदारी न्यायालयाकडूनच संपुष्टात आणली गेलीय,या गोष्टीलाही चौदा–पंधरा वर्षांचा काळ लोटला आहे.आता विठ्ठल मंदिरात सर्व जातीतील स्त्रीपुरुष पुरोहितांची सरकारी नियमाप्रमाणे नियुक्ती होते.तसेच दक्षिणेसाठी सामान्य वारकऱ्यांना लुबाडण्याचे प्रकारदेखील थांबले आहेत.सनातनी प्रवृत्तीशी या थेट संघर्षाच्या काळातले एक वारकरी योद्धे म्हणून स्मृतिशेष ह.भ.प. शिवराज (रामदास) महाराज जाधव यांचा उल्लेख केल्याशिवाय पंढरपूर देवस्थानातील संघर्षगाथा पूर्णच होऊच शकत नाही. अशा या संत तुकोबारायांचा विद्रोही बाणा जपणाऱ्या वारकरी योद्धयाचा आणि त्यांच्या संग्रामशील जीवनाचा रसाळ परिचय करुन देणारा स्मृतिग्रंथ निर्धार अलिकडेच प्रकाशित झाला आहे.हा ग्रंथ महाराजांचे अध्यात्मिक वारसदार ह.भ.प. भारत महाराज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली युवा किर्तनकार,वारकरी संप्रदायाचे साक्षेपी अभ्यासक,वक्ते,लेखक ह.भ.प. ज्ञानेश्वर बंडगर यांनी संपादित केला आहे.

महाराष्ट्रात जेव्हा मराठा सेवा संघ ही परिवर्तनवादी संघटना ऐन भरात होती तेव्हा ठिकठिकाणी शिवधर्म परिषदा आयोजीत केल्या जात होत्या. या परिषदांमधून लोकांचे मोठ्या प्रमाणात प्रबोधन होत होते.अनेक वक्ते आपल्या परखड विचार आणि वक्तृत्वाने हजारोंना प्रभावीत करीत होते. या शिवधर्म परिषदांमध्ये व्याख्यान देणाऱ्या प्रमुख वक्त्यांच्या नावात रामदास उर्फ शिवदास महाराजांचे नाव हमखास असायचे,त्यांनी आपल्या धगधगत्या विद्रोही विचारांनी महाराष्ट्र पिंजून काढला होता.

शेकडो वर्षांपासून वारकरी संतांचा छळ करणाऱ्या सनातनी प्रवृत्ती अजूनही संपलेल्या नाहीत,मंबाजीचे वारसदार आजही सामान्य वारकऱ्यांना,संतसज्जनांना छळतच आहेत. हा धागा पकडून महाराज अभ्यासपूर्ण पद्धतीने दणदणीत व्याख्याने देत असत. त्यातून वारकरी संतांनी सांगितलेला खरा धर्मच पुन्हा सोप्या भाषेतून महाराज मांडत असत.जे हजारो वारकरी आणि कार्यकर्त्यांना मनापासून आवडायचे. अशा रामदास महाराजांनी सनातनी प्रवृत्तींविरोधात अथक संघर्ष केला,संघटन उभारले,लोकांना एकत्र केले.असत्याविरुद्ध सत्याचा आवाज बुलंद केला त्याचाच विस्तृतपणे आढावा या स्मृतिग्रंथात घेण्यात आला आहे.महाराजांच्या कार्याची ओळख असणाऱ्या अनेक नामवंत लेखकांनी या ग्रंथातून अभ्यासपूर्ण पद्धतीने त्यांचे व्यक्तीमत्व आणि कार्य यांचे शब्दचित्र रेखाटले आहे. यातून रामदास महाराजांच्या व्यक्तीमत्वाचे अनेक अज्ञात पैलू आणि प्रसंग,घटनांची माहिती वाचकांना मिळते. त्यामुळे हा स्मृतिग्रंथ म्हणजे वारकरी चळवळीच्या इतिहासातील विश्वासार्ह ऐवजच बनला आहे,असे म्हटल्यास वावगे ठरु नये! समतेचे महातत्त्व प्राणाहूनही प्रिय असणाऱ्या वारकरी संप्रदायात काळाच्या ओघात अनेक सनातनी प्रवत्ती घुसल्या आणि प्रस्थापित झाल्या.ज्यांनी संत ज्ञानोबा आणि त्यांच्या भावंडांचा छळ केला त्याच प्रवृत्ती आता ज्ञानोबा आमचे म्हणून हक्क सांगताना दिसतात.अशा कुप्रवृत्तीनां संत तुकोबांच्या खरमरीत भाषेत सुनावणारे कृतीशील समाजधुरीण म्हणून रामदास महाराज परिचीत होते. पालखी सोहळ्यादरम्यान संतांच्या पालख्यांना मानपान देण्यात भेद करणाऱ्यांविरुद्ध उघडपणे बंड पुकारणाऱ्या रामदास महाराजांनी वारकरी हा लेचापेचा नसल्याचे तर तो तुकोबांप्रमाणे विद्रोहाचे रणशिंग फुंकणारा असल्याचे आपल्या हयातीत वेळोवेळी दाखवून दिले होते,त्यांच्या या उघड बंडखोरीने सनातनी छावणी अक्षरशः हादरुन जात असे.अशा अनेक घटना आणि प्रसंगांची या ग्रंथामधून आपणांस माहिती मिळते.

आजच्या काळातसुद्धा वारकरी संप्रदायात काही वर्णवर्चस्ववादी मंडळी कसा जातीभेद करतात आणि तो मोडून काढण्यासाठी संघर्षाचे हत्यार उपसण्यात महाराज कधीही मागे राहात नसत याचेही दाखले मिळतात.शिवराज महाराजांनी वारकरी किर्तनांमधून शिव–फुले–शाहू–आंबेडकरी विचारांची धगधगती मशाल पेटविण्याचे थोर कार्य केले.कैकाडी महाराजांनी संत गाडगेबाबांची किर्तनपरंपरा पुढे नेली तीच परंपरा शिवदास महाराजांनी चालविली.ब्राह्मणी व्यवस्थेशी थेट सामना करणाऱ्या नीडर किर्तनकारांपैकी ते होते.पुरोहितशाहीच्या अक्राळविक्राळ विळख्यातून सामान्य वारकऱ्यांना बाहेर काढण्याचे काम अतिशय निष्ठेने करणारे म्हणून त्यांची ओळख कायम राहाणार आहे.



भरत यादव
yadavbh515gmail.com
मो. ९८९०१४०५००, सोलापूर

महाराजांचे हे क्रांतीकारी कार्य जवळून पाहाणाऱ्या आणि त्यांच्या खांद्याला खांदा लावून त्यांना साथ सोबत देणाऱ्या परिवर्तनवादी चळवळीतील अनेक मान्यवरांनी या स्मृतीग्रंथाच्या निमित्ताने आपल्या आठवणींना उजाळा दिला आहे.महाराजांना तुकोबांची गाथा प्रचंड प्रिय होती त्यामुळे तुकाराम गाथेची देखणी आर्वृत्ती काढून ती महाराष्ट्रभरातल्या वारकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य त्यांनी केले होते.महाराज मुख्यत्वे अध्यात्मिक क्षेत्रात कार्यरत असले तरी त्यांचा समाजाच्या विविध क्षेत्रात सहज वावर होता. राजकारण,पत्रकारिता,वैचारिक, सामाजिक, शैक्षणिक अशा क्षेत्रात ते प्रत्यक्ष कार्यरत होते.त्यामुळे या क्षेत्रातील अनेक नामवंतांशी त्यांची घट्ट मैत्रीदेखील होती. त्याची प्रचिती या ग्रंधामधील लेखकांच्या नावाच्या यादीमधून येते.

वारकरी संप्रदायाच्या प्रमुख तिर्थक्षेत्रांवर सनातनी प्रवृत्तीचे वर्चस्व होते.त्या वर्चस्वाला महात्मा जोतीराव फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांनी प्रथमतः सुरुंग लावण्यास सुरुवात केली.वारकरी संप्रदायाचा निखळ विचार वारसा विकृत करणाऱ्या अपप्रवृत्तींशी सामना करताना या कार्यकर्त्यांनी कधीच मागेपुढे पाहिले नाही.संत तुकाराम,संत गाडगेबाबा या थोर प्रबोधनकारांच्या पाऊलवाटेवरुन चालणाऱ्या प.पू.कैकाडी महाराजांची गादी चालविणाऱ्या शिवदास महाराजांनी वारकरी संप्रदायाचा मूळ विचार वारसा जपण्याचे आणि तो लोकांपर्यंत नेण्याचे कार्य अतिशय निष्ठापूर्वक केले.विठ्ठलरुक्मिणी मंदिर देवस्थानाचे विश्वस्त बनल्यानंतर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात रामदास उर्फ शिवदास महाराजांच्या किर्तनांची लोकप्रियता वाढत गेली.सामान्य जनतेच्या डोक्यातली अंधश्रद्धांची,बुरसटलेल्या रुढीपरंपरांची जळमटे साफ करण्याचे काम किर्तनामधून,व्याख्यानांमधून ते करीत होते.ज्येष्ठ विचारवंत डॉ.आ.ह.साळुंखे यांच्यापासून ते पुरुषोत्तम खेडेकर,गंगाधर बनबरे,संपत मोरे,अरुण शिंदे अशा वैचारिक,सामाजिक,शैक्षणिक तसेच राजकीय क्षेत्रातील अनेक नामवंतांनी 'निर्धार' या स्मृतिग्रंथात आपले विचार व आठवणी लिहिल्या आहेत.सत्य आणि न्यायाच्या बाजूने ठाम उभे राहून अन्यायी सनातनी प्रवृत्तीशी झुंजण्याची प्रेरणा देणारा हा ग्रंथ आहे.जो प्रत्येक मराठी वाचकाने मूळातून वाचला पाहिजे.अलिकडेच म्हणजे २०२० साली वैकुंठवासी झालेल्या ह.भ.प.रामदास उर्फ शिवदास महाराजांचे संघर्ष कार्य आणि वादळी जीवन समजून घेण्यासाठी ह.भ.प.ज्ञानेश्वर बंडगर यांनी संपादित केलेला हा स्मृतिग्रंथ अतिशय उपयुक्त ठरतो.

पुस्तकाचे नावः 'निर्धार'


**( ह.भ.प.रामदास महाराज जाधव स्मृतिग्रंथ)**

**संपादकः ह.भ.प.ज्ञानेश्वर बंडगर**

**प्रकाशकः लोकायत प्रकाशन,सातारा**

**पृष्ठसंख्याः २५४**

**स्वागत मूल्यः दोनशे पन्नास रुपये**



ग्रंथगोतावळा भाग १६

# तुळजाभवानी मंदिरास वर्षभरात ८० कोटींचे उत्पन्न

## ■ देवीचरणी १७ किलो सोने आणि २५६ किलो चांदी अर्पण
## ■ मागील वर्षीपेक्षा उत्पन्नात १४ कोटींची वाढ



आरंभ मराठी । तुळजापूर

२०२४ – २०२५ या संपलेल्या आर्थिक वर्षात तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या उत्पन्नात ८० कोटी ८१ हजार रुपयांची भर पडली आहे. गत वर्षीच्या ६६ कोटी ८१ लाख रुपयांच्या तुलनेत उत्पन्नात १४ कोटी रूपयांची वाढ नोंदवण्यात आली आहे. याशिवाय भाविकांनी देवीचरणी १७ किलो सोने आणि २५६ किलो चांदी अर्पण केली आहे. तुळजाभवानी मंदिरात भाविकांच्या सुलभ दर्शनासाठी करण्यात येत असलेल्या उपाययोजनामुळे मंदिर संस्थानच्या उत्पन्नात सातत्याने वाढ नोंदवण्यात आली आहे. विशेषत: कोरोना महामारी नंतर भाविकांचा गर्दीत ही मोठी वाढ झाली आहे. मंगळवार, शुक्रवार, पोर्णिमा या देवीच्या वारांसह रविवार तसेच सलग सुट्ट्यांमध्ये तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी भाविकांची प्रचंड गर्दी होत आहे. भाविकांच्या वाढलेल्या गर्दीसोबतच तुळजाभवानी मातेच्या उत्पन्नातही भर पडल्याचे दिसून येत आहे. तुळजाभवानी मातेच्या उत्पन्नात सर्वाधिक वाटा अपेक्षेप्रमाणे सशुल्क दर्शनाचा आहे. त्या खालोखाल सिंहासन पेटी व बँकेच्या विविध ठेवीच्या माध्यमातून तुळजाभवानी मातेला उत्पन्न मिळाले आहे.

### साल सन २०२४ - २५ चे मिळालेले उत्पन्न

एकूण उत्पन्न – ८ कोटी ८१ हजार ६३६ रूपये
सशुल्क दर्शन – १७ कोटी ०५ लाख ६३ हजार
सिंहासन पेटी – १२ कोटी ७९ लाख ८९ हजार
ठेवीवरील व्याज – २३ कोटी ८१ लाख रुपये इतके उत्पन्न मिळाले आहे.

### तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या २७४ कोटींच्या ठेवी



तुळजाभवानी मंदिर संस्थान च्या एसबीआय, महाराष्ट्र बँक, कॅनरा आदी विविध ५ बँकात २७४ कोटीच्या मुदत ठेवी ठेवण्यात आल्या आहेत. या ठेवींवर वर्षभरात २३ कोटी ८१ लाख रूपये मंदिर संस्थानला व्याज मिळाले आहे.

### गतवर्षीपेक्षा एक किलो सोने वाढले

तुळजाभवानी मंदिर संस्थानला गतवर्षी १६ किलो ४९० ग्रॅम सोने भाविकांनी दान केले होते. यावर्षी त्यामध्ये जवळपास एक किलो सोने वाढले असून, यावर्षी एकुण १७ किलो ६२० ग्रॅम सोने भाविकांनी दान केले आहे. तसेच २५६ किलो चांदीदेखील भाविकांनी अर्पण केली आहे.

### दोन वर्षात उत्पन्नात मोठी वाढ

२०२४ – २५ – ८० कोटी ८१ हजार ६३६ रूपये
२०२३ – २४ – ६६ कोटी ८१ लाख ३७ हजार
२०२२ – २३ – ५४ कोटी २३ लाख २८ हजार रुपये

## चायनीजचे बिल मागितले म्हणून सहा जणांची हॉटेल चालकास बेदम मारहाण

आरंभ मराठी । धाराशिव

चायनीज खाल्ल्याचे हॉटेल चालकाने बील मागितले म्हणून हॉटेल चालकाला सहा जणांच्या जमावाने बेदम मारहाण करून पैसे काढून घेतल्याची घटना धाराशिव शहरात घडली. यासंबधी सविस्तर वृत्त असे की,
आरोपी आकाश बनसोडे, जानराव ॲम्ब्युलन्सचा चालक आणि इतर चार जणांनी (रा. धाराशिव)




दिनांक २५ एप्रिल रोजी रात्री साडेसात वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळील चौपाटी येथील हॉटेल सुर्या चायनिज रेस्टॉरंट येथे फिर्यादी संकेत सुर्यकांत सुर्यवंशी (वय ३७ वर्षे, रा. शिवनेरी चौक, तांबरी विभाग धाराशिव) यांना आरोपींनी चायनिजचे बिल मागितल्याच्या कारणावरुन शिवीगाळ केली. तसेच लाथाबुक्यांनी, टोकदार वस्तुने मारहाण करुन जखमी केली. आरोपींनी फिर्यादीच्या जवळचे पाच हजार रुपये काढून घेतले आणि २७ एप्रिल रोजी जयंतीसाठी ५१,००० रुपये वर्गणी द्यावी लागेल म्हणून धमकावले. यावेळी आरोपींनी कॅश कांउटरचे काच फोडून नुकसान केले व जिवे ठार मारण्याची धमकी दिली. संकेत सुर्यवंशी यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ११८(१),११५(२),३५२, ३५१(२), १८९(२) १९१(३), १९०, ११९(१), ३२४(४) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## जिल्ह्यात वन्यजीवांसाठी महामार्गालगत १०० पाणवठ्यांची केली उभारणी



आरंभ मराठी । धाराशिव

जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गालगत वन्यजीव रक्षणासाठी एक महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेण्यात आला आहे. तामलवडी टोल प्लाझा ते पारगाव टोल प्लाझा या महामार्गाच्या दरम्यान एकूण १०० पाणवठ्यांची उभारणी केली जात असून, प्रत्येक पाणवठा सुमारे ७०० लिटर क्षमतेचा आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश उन्हाळ्यात वन्य प्राण्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासाजवळच पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हा आहे. त्यामुळे प्राण्यांना पाण्याच्या शोधात महामार्ग ओलांडण्याची गरज भासणार नाही तसेच अपघातांमुळे होणाऱ्या वन्यप्राण्यांच्या मृत्यूमध्ये लक्षणीय घट होणार आहे. या अभिनव उपक्रमासाठी संकल्पना आणि निधी जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी उपलब्ध करून दिला असून, प्रत्यक्ष अंमलबजावणी सामाजिक वनीकरण विभाग, धाराशिव यांच्यामार्फत होत आहे. विभागाच्या वतीने हे काम अत्यंत काटेकोर आणि नियोजनबद्धरीत्या पार पडत असून, वन्य प्राण्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य दिले जात आहे. या पाणवठ्यांना दर आठवड्याला एकदा व आवश्यकतेनुसार महिन्यात चार वेळा पाणी पुरवले जाणार आहे. तसेच, पाण्याच्या स्वच्छतेसाठी नियमित देखरेख आणि स्वच्छतेची विशेष व्यवस्था करण्यात येणार आहे, जेणेकरून प्राण्यांना सुरक्षित आणि निर्मळ पाणी मिळू शकेल. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी या उपक्रमास ''वन्यजीवांसाठी संजीवनी'' असे संबोधले असून, महामार्गावरील अपघातांचे प्रमाण निश्चितच कमी होईल असा विश्वास व्यक्त केला आहे. विभागीय वन अधिकारी यांनीही विभागाच्या वतीने वन्यजीवांच्या हितासाठी कटिबद्धतेची ग्वाही दिली आहे. हा उपक्रम वन्यजीव संरक्षण आणि रस्ता सुरक्षेच्या दृष्टीने एक आदर्श पायंडा ठरेल.

# धाराशिवची डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीची शानदार परंपरा

आरंभ मराठी । धाराशिव



महामानव, बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवाची शानदार परंपरा धाराशिव येथे आजही मोठ्या उत्साहात जोपासली जात आहे. विविध जातीधर्मातील लोकांचा उत्स्फूर्त सहभाग हे या जयंती उत्सवाचे खास वैशिष्ट्य आहे. त्यामुळे एकात्मतेचा संदेश देणारा हा जयंती उत्सव संपूर्ण महाराष्ट्र राज्यात खास आकर्षण ठरला आहे. बहुजन योद्धा सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष धनंजय शिंगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली साजऱ्या होणाऱ्या या उत्सवाचे यंदा ३२ वे वर्ष आहे. यावर्षी देखील मोठ्या उत्साहात २७ एप्रिल रोजी पारंपरिक वाद्यांच्या गजरात धाराशिव शहरातून भव्यदिव्य मिरवणूक काढून जयंती उत्सव साजरा करण्यात येत आहे. त्याचबरोबर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिजन्मशताब्दी वर्षानिमित्त देखील विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. बहुजन योद्धा सामाजिक संघटना ही समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन चालणारी संघटना आहे. समाजोपयोगी उपक्रम राबवत गरजू घटकांना आर्थिक मदतीचा हात देणारी ही संघटना गेल्या काही वर्षांपासून लोकप्रिय झाली आहे. कोणताही राजकीय वारसा नसलेल्या भीम नगर येथील गंगाधर शिंगाडे यांच्या कुटुंबात जन्मलेल्या धनंजय (नाना) शिंगाडे यांनी धाराशिव जिल्ह्याच्या सामाजिक, सांस्कृतिक चळवळीला चालना देण्याचे काम आजही मोठ्या जोमाने सुरू ठेवले आहे. पिताश्री गंगाधर शिंगाडे यांच्या नावाने त्यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यस्तरीय गंगाधर करंडक एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. या स्पर्धेला संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील कलावंत उत्स्फूर्तपणे सहभागी होतात. त्यामुळे राज्यस्तरीय गंगाधर करंडक एकांकिका स्पर्धा आज महाराष्ट्रातील नवोदित कलाकारांना संधी देणारा रंगमंच बनला आहे. याकामी त्यांचे बंधू विशाल शिंगाडे यांचे मोलाचे योगदान त्यांना लाभत आहे. त्याचबरोबर जयंती उत्सव समितीच्या वतीने वर्षभर रक्तदान शिबिर, सांस्कृतिक कार्यक्रम, भूकंपग्रस्त, अतिवृष्टीग्रस्त भागातील जनतेच्या पुनर्वसनासाठी आर्थिक मदतीचा हात देणारी संघटना म्हणून आज बहुजन योद्धा सामाजिक संघटनेची ओळख निर्माण झाली आहे.



बहुजन योद्धा सामाजिक संघटनेच्या वतीने आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी दरवर्षी वेगवेगळ्या जातीधर्मातील व्यक्तींना स्थान दिले जाते. गतवर्षी परवेज अहमद तर यावर्षी मुकुंद घुले यांना अध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. समितीचे सर्व पदाधिकारी व सदस्य मोठ्या जोमाने जयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत. या जयंती उत्सवाचे खास वैशिष्ट्य म्हणजे आबाल वृद्धच नाही, तर महिला भगिनी देखील मिरवणुकीत उत्साहाने सहभागी होतात. त्यांच्यासाठी स्वतंत्र सुरक्षा यंत्रणा मिरवणूक सुरू झाल्यापासून सांगता होईपर्यंत दक्ष असते. यावर्षी देखील देशातील विविध भागातील पारंपारिक वाद्य पथकांना मिरवणुकीसाठी आमंत्रित करण्यात आले असून जास्तीत जास्त बांधवांनी यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन बहुजन योद्धा सामाजिक संघटना आणि महामानव, बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078

# शाळातील चिमुकले स्वतःहूनच घेतात प्रशासकीय अधिकारी आणि कार्यालयांच्या भेटी

## लहान गावातील मोठी स्वप्नं : कोकाटेवस्ती शाळेचा आगळावेगळा प्रयोग

हर्षवर्धन मडके । आरंभ मराठी

**मोहा : कळंब तालुक्यातील मोहा येथील कोकाटेवस्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा या शाळेने कायमच नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून आनंददायी शिक्षण देण्याचा आदर्श उभारला आहे. स्थापनेपासून शाळेचा विद्यार्थी संख्या वीसच्या आत असतानाही, मुख्याध्यापक सचिन चांदणे यांच्या उपक्रमशील नेतृत्वाखाली शाळेने गुणवत्तेचा आणि निसर्गरम्य परिसराचा संगम साधला आहे. सध्या राज्य शासनाने निपुण महाराष्ट्र अभियान सुरू केले आहे. या अंतर्गत विद्यार्थ्यांचे वाचन, लेखन, संख्याज्ञान आणि संख्यावरील क्रिया या चार मुख्य घटकांमध्ये प्रगती साधण्यावर भर देण्यात येतो. यासाठी शिक्षण विभागातील अधिकारी आठवड्यातून किमान एका शाळेला भेट देत आहेत. मात्र कोकाटेवस्ती शाळेने याउलट एक आगळावेगळा उपक्रम राबवला विद्यार्थ्यांनीच प्रशासकीय अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यालयात जाऊन भेट देण्याचा अनुभव घेतला.**









'परिसर अभ्यास' या विषयाच्या अनुषंगाने, शाळेतील विद्यार्थी थेट जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात पोहोचले. जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी मुलांचे गोड कॅडबरी व बिस्किट देऊन स्वागत केले. ''एस.पी. म्हणजे काय?'', ''ते गुन्हेगारांना कसे शोधतात?'' अशा विविध प्रश्नांवर साहेबांनी मुलांशी संवाद साधला व मार्गदर्शन केले. यानंतर, पोलीस विभागातील विविध शाखांमध्ये विद्यार्थ्यांनी फेरफटका मारला. सायबर गुन्हे शाखा, वाहतूक नियंत्रण शाखा, बॉम्ब शोधक पथक, ड्रोन कॅमेराचा वापर अशा विविध विभागांची माहिती अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दिली. गायकवाड (डिवायएसपी), चिंतले (एपीआय) आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या आणि प्रत्यक्ष ड्रोन कॅमेऱ्याचे प्रात्यक्षिक दाखवले.

गत्यानंतर मुलांनी जिल्हा पोलिस शस्त्रागाराला भेट दिली. येथे त्यांनी विविध प्रकारची शस्त्रे जवळून पाहिली व हाताळली. रिव्हॉल्व्हर, विविध बंदुका, त्यांच्या गोळ्या व कार्य याची माहिती ताटे (आरएसआय), मुंढे (डीआय) आणि गायकवाड यांनी तळमळीने दिली. यानंतर विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय गाठले. निवासी जिल्हाधिकारी श्रीमती. शोभा जाधव यांनी मुलांशी गप्पा मारून त्यांचे प्रश्न ऐकले. त्यांना चॉकलेट व बिस्किट वाटप केले.



कार्यालयातील विविध विभाग व त्यातील कामकाज याबाबत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळाला. यानंतर जिल्हा परिषद कार्यालयात भेट दिल्यानंतर, विद्यार्थ्यांनी जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) पाटील व उपशिक्षणाधिकारी श्रीमती. पाटील यांची भेट घेतली. अत्यंत प्रेमळ वातावरणात साहेबांनी विद्यार्थ्यांशी सामान्यज्ञान, व्याकरण आणि गणितावर आधारित प्रश्नोत्तरी घेतली. प्रत्येक विद्यार्थ्याला भेटीचा अनुभव विचारण्यात आला, त्यांनी काय पाहिले, काय शिकले याबाबत चर्चा झाली. शाळेचे विविध उपक्रम व गुणवत्तेचे कौतुक करण्यात आले. यावेळी उपशिक्षणाधिकारी यांनी स्वतः एक इंग्रजी राइम्स म्हणत विद्यार्थ्यांमध्ये उत्साह संचारला. चहा, पाणी, बिस्किटे व चॉकलेट्सच्या वाटपानंतर विद्यार्थ्यांना प्रेमळ निरोप देण्यात आला.

या उपक्रमाच्या माध्यमातून लहान वयातच स्पर्धा परीक्षांची माहिती देऊन विद्यार्थ्यांमध्ये प्रशासनाविषयी आदर आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांप्रती आकर्षण निर्माण करण्याचा कोकाटेवस्ती शाळेचा अभिनव प्रयत्न निश्चितच वाखाणण्याजोगा आहे. मुख्याध्यापक सचिन चांदणे व त्यांच्या विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांवरून भरभरून कौतुक करण्यात येत आहे.



### विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख देणारी शाळा

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोकाटेवस्ती (मोहा) ही केवळ शिक्षणाचे केंद्र नसून स्वप्नांना पंख देणारे एक श्रद्धास्थळ आहे. मोजक्या विद्यार्थ्यांमध्येही मोठ्या आशा आणि आकांक्षा रुजवणारे हे ठिकाण आज एक प्रकाशस्तंभ बनले आहे. मुख्याध्यापक सचिन चांदणे यांनी केवळ पुस्तकी शिक्षणापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या मनात प्रशासकीय सेवांची, देशसेवेची आणि उच्च ध्येयांची ज्योत चेतवली आहे. लहानशा गावातील या मुलांनी थेट जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांसारख्या उच्च अधिकाऱ्यांशी संवाद साधत आपल्या स्वप्नांना आकार देण्याचा अनोखा अनुभव घेतला. या शाळेचा हा प्रवास म्हणजे ग्रामीण शिक्षण क्षेत्रातील एक जिवंत चमत्कार आहे, जिथे एक शिक्षक आपल्या निष्ठेने आणि विद्यार्थ्यांच्या हातात विश्वासाचे नवे आकाश सोपवत आहे.

## विविध वृत्त...

### तलमोड येथील भारत विद्यालयाची विद्यार्थिनी श्रुती ढोणे शिष्यवृत्ती परीक्षेत प्रथम




आरंभ मराठी । उमरगा

भारत शिक्षण संस्था उमरगा संचलित, श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय तलमोड येथील विद्यार्थिनी श्रुती ढोणे हीने शिष्यवृत्ती परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावला. इयत्ता आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत ३०० पैकी १६० गुण घेऊन तिने घवघवित यश प्राप्त केल्याबद्दल प्रशालेच्या वतीने तिचा सत्कार करण्यात आला. प्रशालेचे मुख्याध्यापक मोरे विराज यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच शालेय समितीचे अध्यक्ष अश्लेष शिवाजीराव मोरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी विद्यार्थीनीचे पालक काशीनाथ ढोणे, प्रशालेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

### प्रबोधनकार दिव्या शिंदे यांचा सत्कार



आरंभ मराठी । धाराशिव

मुक्ताई बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने आंबेडकरी चळवळीतील सर्वात तरुण व अभ्यासी नेतृत्व प्रबोधनकार दिव्या शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सोमनाथ गायकवाड, आरपीआयचे शहराध्यक्ष उदय बनसोडे, सुशील शिंदे, शितल धावारे, मुकेश मोठे, रंजीत चव्हाण, समाधान वाघमारे, नवनाथ सोलंकर आणि सहकारी उपस्थित होते.

### बोरी येथे वीज पडून युवकाचा मृत्यू

आरंभ मराठी । उमरगा

उमरगा तालुक्यातील बोरी येथे वीज पडून एका युवकाचा मृत्यू झाला. या मयताच्या कुटुंबीयांची आमदार प्रवीण स्वामी यांनी शनिवारी सकाळी भेट घेऊन सांत्वन केले. बोरी येथील अमोल संतराम मदने (वय ३८) या युवकाचा शुक्रवारी सायंकाळी शेतात वीज पडल्याने मृत्यू झाला. आमदार प्रवीण स्वामी यांनी शनिवारी मयताच्या कुटुंबाची भेट घेऊन वारसांना तात्काळ अर्थसहाय्य करण्याच्या सूचना यावेळी उपस्थित तहसीलदार गोविंद येरमे यांना दिल्या.

## संत गोरोबा काकांच्या समाधी सोहळ्यानिमित्त कार्यक्रम



आरंभ मराठी । धाराशिव

वैराग्य महामेरू श्री संत शिरोमणी गोरोबा काका यांच्या समाधी सोहळा व पुण्यतिथी निमित्त कुंभार गल्ली येथे सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. धाराशिव शहरामध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये भजन मूर्ती पूजन दिंडी व पालखी सोहळा आरोग्य तपासणी शिबिर आरती व गुलाल पुष्प उधळण सोहळा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळी सात वाजता नागनाथ कुंभार , (उपाध्यक्ष,अखिल भारतीय प्रजापती कुंभकार महासंघ), महादेव खटावकर,( जिल्हाध्यक्ष , अखिल महाराष्ट्र कुंभार समाज) ,व पांडुरंग कुंभार, (युवा जिल्हाध्यक्ष,अखिल महाराष्ट्र कुंभार समाज),लिंबराज कुंभार,(युवा उपाध्यक्ष, अखिल महाराष्ट्र कुंभार समाज) यांच्या हस्ते मूर्ती पूजन पालखी व दिंडी सोहळ्याचे उद्घाटन करून दिंडी सोहळा सुरुवात केली,दिंडीचा मार्ग छत्रपती शिवाजी महाराज चौक पोस्ट ऑफिस काळा मारुती चौक नेहरू चौक व कुंभार गल्ली धाराशिव येथे दिंडीची सांगता करण्यात आली.

या ठिकाणी उपस्थित कृष्णा कुंभार, अमृत कुंभार, रामभाऊ कुंभार, विष्णू कुंभार, प्रसाद गोरे, शंकर गोरे, बालाजी कुंभार, अभिषेक कुंभार, शुभम कुंभार, समर्थ कुंभार, राजेश कुंभार, सागर कुंभार, पंकज कुंभार, प्रशांत कुंभार, नामदेव शिरसागर बाळू बाळासाहेब कुंभार बापू कुंभार सुनील कुंभार स्वप्निल कुंभार अंबादास कुंभार बळीराम कुंभार नाना कुंभार कृष्णा कुंभार श्रीकांत कुंभार अभिजीत कुंभार उपस्थित होते त्यानंतर मोफत आरोग्य शिबिर याचे उद्घाटन माननीय श्री दिगंबर कुंभार नागनाथ कुंभार व भागवत कुंभार यांच्या हस्ते करण्यात आले. श्री संत गोरोबाकाका यांची आरती व पुष्प गुलाल उधळण सोहळा डॉ. रमेश जावळे व दिगंबर बळीराम कुंभार यांच्या हस्ते करण्यात आली. त्यानंतर महाप्रसादाचे नियोजन करण्यात आले यावेळी भाविक महिला- पुरुष, बच्चे कंपनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री. काळ भैरवनाथ यात्रेनिम्मित आलेल्या भाविकांना पिण्याच्या पाण्याची सोय

आरंभ मराठी । परंडा

स्व. पांडुरंग मामा कोळगे यांच्या स्मरणार्थ पाणपोई चा शुभारंभ सोनारी चौक येथे राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा अध्यक्ष राहुल बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे या ही वर्षी कोळगे परिवाराच्या वतीने भाविक भक्तांना थंड पाणी व गुळाचा खडा वाटप करण्यात येत आहे. यावेळी जिजाऊ ब्रिगेड मराठवाडा सरचिटणीस सौ.आशाताई मोरजकर, महाराष्ट्र चॅम्पियन संजय आप्पा काशीद, माजी नगरसेवक गणेश राशनकर, मराठा सेवा संघाचे तालुका अध्यक्ष गोरख मोरजकर, संभाजी ब्रिगेड तालुका अध्यक्ष समाधान खुळे, मुद्रांक विक्रेते जाकीर पटेल, राजकुमार देशमुख आदी उपस्थित होते. या पाणपोईला तहसिलदार निलेश काकडे, पोलीस निरीक्षक ओंकार पारेकर , बीट अंमलदार नितीन गुंडाळे, मंडळ अधिकारी पवार, माजी नगरसेक इरफान शेख, हाफीज करपुडे, हाफीज सक्लेन सौदागर, पत्रकार किरणं डाके, हाफीज करपुडे यांनी भेट दिली.



## डॉ.रामलिंग पुराणे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर गौरव पुरस्कार जाहीर

आरंभ मराठी । मुरूम

मुरूम येथील सामाजिक कार्यकर्ते तथा बसव प्रतिष्ठाणचे अध्यक्ष डॉ. रामलिंग काशिनाथ पुराणे यांना ए.डी. फौंडेशन, महाराष्ट्र राज्याच्या वतीने देण्यात येणारा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर गौरव पुरस्कार २०२५ निमित्त सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र समाजभूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला. २५ मे ला सोलापूर येथील निर्मिती लॉन्स येथे फौंडेशनच्या वतीने आयोजित कार्यक्रमात राज्यातील प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देऊन त्यांना गौरविण्यात येणार असल्याचे संस्थापक अध्यक्ष अशोक गोरड यांनी पत्राद्वारे कळविले आहे. डॉ.रामलिंग पुराणे यांचा संघटनात्मक धोरण, सामाजिक कार्य, पत्रकारिता यावर मजबूत पकड असून, समाजाच्या प्रगतीसाठी सामाजिक कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग असतो.



त्यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर पन्नास हुन अधिक यशस्वी आंदोलने झाली आहेत. त्यांनी राज्यातील धाराशिव, पुणे, वर्धा, मुंबई येथील आझाद मैदान, दिल्ली येथील जंतरमंतर मैदानात यशस्वी आंदोलने केली आहेत. बेरोजगार, कष्टकरी, शेतकरी, आरोग्यविषयक सह समाजातील सर्व घटकातील नागरिकांसाठी न्याय मिळवून देण्यासाठी त्यांचा संघर्ष चालू आहे. डॉ.पुराणे यांना आतापर्यंत सामाजिक कार्यातील डॉक्टरेट, समाजभूषण, कोरोना योद्धा, जननायक, समाजचिंतक, लोकतंत्र के प्रहरी, शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२४ अशा विविध पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

## उद्या जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीची सभा

आरंभ मराठी । धाराशिव

जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीची जानेवारी ते मार्च २०२५ या कालावधीतील त्रैमासिक सभा उद्या (दि.२८) दुपारी १२.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात होणार आहे. या बैठकीत भ्रष्टाचारासंदर्भातील तक्रारींवर चर्चा होणार आहे. तक्रारी प्रथम तालुकास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समिती किंवा संबंधित विभागाच्या जिल्हा दक्षता समितीकडे द्याव्यात.अपेक्षित कार्यवाही न झाल्यास,त्या तक्रारी जिल्हास्तरीय समितीकडे पाठविता येतील. प्रत्येक विभागाने जिल्हास्तरीय दक्षता समितीमार्फत तक्रारींचा निपटारा करावा. भ्रष्टाचारासंबंधी पुरावे असल्यास,ते तालुका भ्रष्टाचार निर्मूलन समिती किंवा जिल्हा दक्षता समितीकडे सादर करावेत.समितीकडे आलेल्या तक्रारींची ३० दिवसांत चौकशी करून,संबंधित कार्यालयाच्या दक्षता समितीकडे पाठविण्यात येईल.जिल्हा दक्षता समितीने ९० दिवसांत निर्णय घ्यावा व दोषी अधिकाऱ्यांविरोधात शिस्तभंग कारवाईसाठी अहवाल सादर करावा. ९० दिवसांत कार्यवाही न झाल्यास, तक्रारदार जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे पुराव्यासह तक्रार करू शकतो.तक्रार दाखल करताना,आधीच्या टप्प्यांतील अर्ज व पुराव्यांची प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.

## पूर्व प्राथमिक शिष्यवृती परीक्षेत भाटशिरपूरा शाळेचे यश; शाळेतील सात विद्यार्थी पात्र

आरंभ मराठी । कळंब

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने दिनांक ९ फेब्रुवारी रोजी घेतलेल्या पूर्व उच्चप्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतिम निकाल शुक्रवारी (दि.२५) जाहीर झाला.

या परीक्षेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भाटशिरपूरा येथील ७ विद्यार्थी पात्र झाले आहेत. यामध्ये तेजस्विनी श्रीमंत वाघमारे, अनिकेत बिभीषण मस्के, राजनंदिनी नितीन वाघमारे, सयाजी तुषार जाधव, वैष्णवी अशोक सिरसट, सुप्रिया अशोक वाघमारे व प्रणाली अशोक खापे यांचा समावेश आहे.



या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.यशस्वी विद्यार्थ्यांना अमोल बाभले, श्रीकांत तांबारे, राजाभाऊ शिंदे,शहाजी बनसोडे सचिन तामाने यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक बाळकृष्ण तांबारे, लिंबराज सुरवसे, प्रमोदिनी होळे, रंजना थोरात यांनी अभिनंदन केले. या सत्कार सोहळ्यास संभाजी बिग्रेडचे संघटक अतुल गायकवाड, व्हा. चेअरमन अशोक सिरसट, तुषार जाधव, अशोक वाघमारे, बिभीषण मस्के, राजकन्या सिरसट, अश्विनी वाघमारे, रोहिणी वाघमारे, पुष्पा मस्के यांच्यासह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तुळजापूर विभागात महावितरणचा उमरगा उपविभाग ठरला सर्वोत्कृष्ट

आरंभ मराठी । उमरगा

महावितरणच्या तुळजापूर विभागात उमरगा उपविभागाने मार्च २०२४-२५ या आर्थिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी करत सर्वोत्कृष्ट उपविभाग म्हणून प्रतिष्ठेचा पुरस्कार पटकावला. महावितरणच्या तुळजापूर विभागीय कार्यालयात नुकत्याच पार पडलेल्या ''कर्तव्यदक्ष कर्मचारी गुणगौरव सोहळा'' कार्यक्रमात हा सन्मान प्रदान करण्यात आला. यावेळी कार्यकारी अभियंता नंदकुमार काळे यांच्या हस्ते उमरगा शहर शाखेला उत्कृष्ट ग्राहक सेवा, वीजबिल थकबाकी वसुली व सर्वांगीण कामगिरीसाठी गौरविण्यात आले. उमरगा उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता सचिन रेकूलवाड यांना ऊर्जा शिरोमणी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर उमरगा शहर शाखेचे शाखा अभियंता औदुंबर मोरे यांना वीजबिल वसुलीतील उत्कृष्ट योगदानासाठी ऊर्जारत्न पुरस्कार देण्यात आला. याचप्रमाणे, शाखेतील अंजली घोडके यांना ऊर्जामित्र पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमात उपस्थित सर्व उमरगा उपविभागातील कर्मचारी व अधिकारी यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी धाराशिव मंडळाचे अधीक्षक अभियंता संजय आडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच, शाखेतील प्रधान तंत्रज्ञ राऊत, वरिष्ठ तंत्रज्ञ शाम आबाचणे, अमोल पाटील, अंजली घोडके तसेच लाईनमन वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. या यशामुळे उमरगा उपविभागाने संपूर्ण तुळजापूर विभागात आपली वेगळी छाप उमटवली असून, सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.



# सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनास्थेमुळे पोहनेर रस्त्याची दुरावस्था

## ■ खड्ड्यामुळे दोन महिलांची रस्त्यातच झाली प्रसूती; दररोज अपघातांची मालिका
## ■ रस्त्याअभावी चार गावच्या मुलींनी अर्ध्यातूनच सोडले शिक्षण

आरंभ मराठी SPECIAL

सज्जन यादव । आरंभ मराठी

**धाराशिव : धाराशिव ते पोहनेर या रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली असून, या रस्त्यावरून मार्ग काढणे कठीण बनले आहे. रस्त्याचे काम सहा महिन्यांपूर्वी सुरू झाले असतानाही ते मधेच बंद झाले असून, बंद पडलेले काम सुरू करण्याची तसदी बांधकाम विभागाकडून घेतली जात नाही. रस्त्यांवरील खड्ड्यामुळे मागील दोन महिन्यात दोन गर्भवती महिलांची प्रसूती रस्त्यावरच झाल्याच्या गंभीर घटना घडल्या असतानाही सार्वजनिक बांधकाम विभागाला जाग आलेली नाही. रस्त्यावर गंभीर अपघातांची मालिका सुरूच असून, यामध्ये अनेक लोक जखमी झाले आहेत. विशेष म्हणजे रस्त्याच्या समस्येमुळे या मार्गावरील चार गावातील मुलींनी शिक्षण अर्ध्यातूनच सोडल्याच्याही गंभीर घटना घडल्या आहेत.**

धाराशिव तालुक्यातील पोहनेर या गावाला जाणाऱ्या रस्त्याची अवस्था अतिशय बिकट झाली असून, या रस्त्यावरून रहदारी करताना अपघाताच्या अनेक घटना घडल्या आहेत. हा रस्ता पोहनेर या गावासह इतर पाच गावांना जोडणारा अतिशय महत्वाचा रस्ता आहे. चाळीस वर्षापूर्वी तयार करण्यात आलेल्या या डांबरी रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली आहे. पोहनेर, बेगडा, सुर्डी, गावसुद आणि केकस्थळवाडी या पाच गावांनी वारंवार मागणी केल्यानंतर मागील वर्षी या रस्त्याच्या रुंदीकरणासह मजबूत डांबरीकरण करण्याचे काम मंजूर करण्यात आले होते. धाराशिव शहरातील तुळजापूर नाका ते पोहनेरच्या सबस्टेशन पर्यंत पाच किलोमीटरचा रस्ता मागील वर्षी मंजूर करण्यात आला आहे. २ कोटी ३३ लाख रुपयांचा हा रस्ता करण्याचे काम कंत्राटदाराला दिले आहे. मागील वर्षी सप्टेंबर महिन्यात संबंधित कंत्राटदाराने या रस्त्याचे काम सुरू केले. तीन महिने साईडपट्ट्या भरण्याचे आणि सिमेंट रस्त्याच्या कामाचा काही भाग तयार करण्यात आला आहे. परंतु, संबंधित कंत्राटदाराने सिमेंट रस्त्याचे काम निकृष्ट केल्याचा ठपका त्याच्यावर ठेवल्यामुळे कंत्राटदाराने जानेवारी पासून रस्त्याचे काम बंद केले. त्यानंतर मागील चार महिन्यात या रस्त्याचे काहीच काम केलेले नाही. सध्या रस्त्याची अवस्था प्रचंड बिकट झाली असून, दोन फुटांचे खड्डे रस्त्याला पडलेले आहेत. सहा गावातील नागरिक जीव मुठीत धरून या रस्त्यावरून प्रवास करत असून, अपघाताच्या गंभीर घटना दररोज घडत आहेत.





### खड्ड्यामुळे दोन महिलांची रस्त्यावरच प्रसूती

या रस्त्यावरील खड्ड्यामुळे गर्भवती असलेल्या दोन महिलांची रस्त्यावरच प्रसूती झाल्याच्या दोन गंभीर घटना मागील दोन महिन्यात घडलेल्या आहेत. सुर्डी येथील एक आणि पोहनेर येथील एका महिलेची प्रसूती काम सुरू असलेल्या रस्त्यावरच झाली आहे. सुदैवाने यात संबंधित महिला आणि नवजात बाळ व्यवस्थित असले तरी गंभीर प्रकार घडल्या नंतरही बांधकाम विभागाला जाग येत नसल्यामुळे नागरिकांतून संताप व्यक्त केला जात आहे.

### दररोज अपघातांची मालिका सुरूच

या मार्गावर मागील सहा महिन्यांपासून दररोज अपघाताची मालिका सुरू आहे. रस्त्याचे काम सहा महिन्यापूर्वी सुरू झाले होते. जानेवारी पासून काम बंद आहे. कामासाठी आणलेली खडी तशीच रस्त्यावर पडून असल्यामुळे रस्ता अरुंद झाला आहे. त्यातच अंधाऱ्या रात्री रस्त्यावरील खडीचा अंदाज न आल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. काही ठिकाणी रस्त्याच्या कडेला खोदलेले खड्डे तसेच असून त्यातही दुचाकी चालक पडत आहेत. मागील चार महिन्यात सहा गंभीर अपघात या रस्त्यावर झाले असून, यामध्ये दोन व्यक्तींचे पाय मोडले आहेत तर एका महिलेच्या मेंदूला गंभीर इजा पोहोचली आहे.

### प्रशासनाला निवेदन देऊनही दखल नाही

रस्त्यावर वारंवार अपघात होत असल्यामुळे आणि महिलेची प्रसूती रस्त्यावरच झाल्यानंतर पोहनेर आणि केकस्थळवाडी येथील नागरिकांनी दिनांक १३ फेब्रुवारी रोजी निवासी उपजिल्हाधिकारी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाला रस्त्याचे बंद पडलेले काम तात्काळ सुरू करण्यासाठी निवेदन दिले होते. निवेदन देऊन दोन महिने होऊन गेले तरी त्याची दखल घेतली नाही. तसेच स्थानिक आमदारांनी बांधकाम विभागाला सूचना देऊनही त्याचीही दखल घेण्यात आलेली नाही.

### खराब रस्त्यामुळे एसटी बस बंद

रस्त्याच्या खराब अवस्थेमुळे आणि वारंवार अपघात होत असल्यामुळे या मार्गावर जाणाऱ्या एसटी बस बंद करण्यात आल्या आहेत. पूर्वी या मार्गावर दररोज दहा एसटी बस धावत होत्या. सध्या हे प्रमाण चारवर आले आहे. एसटी बस बंद झाल्यामुळे सहा गावातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यात समस्या निर्माण झाली असून, बऱ्याच मुलींनी शिक्षण अर्धवट सोडून दिल्याचेही सांगितले जात आहे. बांधकाम विभागाच्या अकार्यक्षमतेचा दूरगामी परिणाम सहा गावांवर झाला असून, आता तरी या समस्येची दखल घ्यावी अशी मागणी नागरिक करत आहेत.



### दोन दिवसात काम सुरू होईल

पोहनेर रस्त्याचे काम सुरू करण्यात आलेले होते. परंतु, त्यामध्ये खंड पडला होता. पुढील दोन दिवसात या रस्त्याचे काम सुरू होणार आहे. खडी फोडून घेतली असून, संबंधित गुत्तेदाराला काम दोन दिवसात सुरू करण्यास सांगितले आहे.

**–प्रकाश मोरे**
**उपकार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग.**

## जिल्ह्यात ११ मेपर्यंत जमावबंदी आदेश लागू

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव जिल्ह्यात विविध सण, उत्सव आणि आंदोलनात्मक कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी २८ एप्रिल २०२५ रोजी रात्री १ वाजतापासून ते ११ मे २०२५ रोजीचे रात्री १२ वाजेपर्यंत जमावबंदी व शस्त्रबंदी आदेश लागू केला आहे. १४ ते ३० एप्रिलपर्यंत डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती,२९ एप्रिल – श्री. छत्रपती शिवाजी महाराज जयंती (परंपरेने) व परशुराम जयंती,३० एप्रिल –महात्मा बसवेश्वर महाराज जयंती आणि १ मे रोजी महाराष्ट्र दिन साजरा करण्यात येणार आहे.अपर जिल्हादंडाधिकारी शोभा जाधव यांनी या काळात हे सण – उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये हा आदेश जारी केला आहे.

## व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात वसुंधरा दिन उत्साहात साजरा





आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात ग्रीन क्लबच्या वतीने जागतिक वसुंधरा (पृथ्वी) दिन साजरा करण्यात आला. यावेळी ग्रीन क्लबचे जिल्हा नोडल अधिकारी प्रा. डॉ. विनोदकुमार वायचळ यांचे पर्यावरण विषयक जनजागृती आणि जल व्यवस्थापन या विषयावर व्याख्यान झाले. या प्रसंगी ग्रीन क्लब अंतर्गत कचरा व्यवस्थापन क्लबचे सदस्य प्रा. अभय शिंदे , ऊर्जा व्यवस्थापन क्लब चे सदस्य प्रा. डॉ. लक्ष्मण चिखले , जैव विविधता संरक्षण क्लब चे सदस्य प्रा. डॉ. अनिल देवकर, पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रम क्लब चे समन्वयक प्रा. अमोल हिंगमिरे आणि राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रशांत गुरव यांची व्याख्याने संपन्न झाली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक ग्रीन क्लब युवा अध्यक्ष नंदकिशोर भिसे यांनी केले. सूत्रसंचालन ग्रीन क्लब युवा उपाध्यक्ष कु. प्रगती माळी व ग्रीन क्लब प्रचार समन्वयक कु. आरती इंगळे यांनी केले. तर प्रदर्शन ग्रीन क्लब दस्तावेज समन्वयक कु. बीबी हाजरा पटेल यांनी आभार मानले.

# एक लाख रूपयांपेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्यांचे रेशनकार्ड होणार रद्द

### उत्पन्नानुसार शिधापत्रिका देण्याचे शासनाचे आदेश

आरंभ मराठी । धाराशिव

शासकीय, निमशासकीय किंवा खासगी क्षेत्रातील कामगार, कर्मचारी ज्यांचे उत्पन्न १ लाखापेक्षा अधिक आहे, त्यांच्याकडे केशरी किंवा पिवळ्या रंगाची शिधापत्रिका असल्यास ती अपात्र ठरवून, त्यांच्या उत्पन्नानुसार नवीन शिधापत्रिका द्यावी, असे आदेश शासनाने दिले आहेत. अपात्र शिधापत्रिकाधारक शोधमोहिमेद्वारे ही अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. खासगी कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या अनेक कामगारांचे वार्षिक उत्पन्न १ लाखापेक्षा अधिक असते, अशा नागरिकांची रेशनकार्ड रद्द होण्याची शक्यता अधिक आहे. दिनांक २९ जून २०१३ रोजी रेशनकार्ड वितरणासाठीची मार्गदर्शक नियमावली जाहीर करण्यात आली होती. त्यानंतर १७ जुलै २०१३ व १७ डिसेंबर २०१३ रोजी सुधारित नियमावली शासनाने जारी केली होती. त्याआधारे पात्रतेच्या निकषांमध्ये वेळोवेळी बदल करण्यात आले असून, ४ एप्रिल २०२५ रोजीचा शासनाने नवीन आदेश जारी केला आहे. त्यानुसार अपात्र शिधापत्रिकाधारकांची शोधमोहीम सुरू करण्यात आली असून, ज्या नागरिकांचे वार्षिक उत्पन्न १ लाखापेक्षा अधिक आहे, त्यांची पिवळी किंवा केशरी शिधापत्रिका रद्द करण्यात येणार आहे. त्यांना शिधापत्रिका बदलून मिळणार आहे. राज्यभर अपात्र शिधापत्रिका शोधमोहीम राबवली जाणार आहे. यामध्ये दुबार नावे, मृत व्यक्तींच्या नावाने सुरू असलेले रेशनकार्ड इत्यादी प्रकरणे ओळखून रद्द केली जातील. एप्रिल महिन्याच्या अखेरपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.




### उत्पन्नासह रहिवासी प्रमाणपत्र लागणार

रेशनकार्ड धारकांना रहिवासी दाखल्यासह उत्पन्नाचा दाखलादेखील सादर करावा लागणार आहे. रेशनकार्डधारक ज्या भागात राहतात, त्या भागातील निवासाचा कोणताही पुरावा आणि त्यासोबत वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयांच्या आत असल्याचा दाखला पडताळणी अधिकाऱ्यांना सादर करावा लागणार आहे.

### तर स्वस्त धान्याचा लाभ नाही

काटकसर व पारदर्शकता राखताना राज्य शासन रेशनकार्ड तपासणी मोहीम राबवणार आहे. मोहिमेत ज्या नागरिकांचे वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, अशांना यापुढे स्वस्त धान्याचा लाभ मिळणार नाही. त्यांच्या शिधापत्रिका (रेशनकार्ड) अपात्र ठरवून बदलून देण्यात येतील.

## मुख्यमंत्री वयोश्री योजनेअंतर्गत आधार प्रमाणीकरण मोहिम सुरू

आरंभ मराठी । धाराशिव

राज्यातील वय वर्षे ६५ व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांच्या दैनंदिन जीवनात सुधारणा करण्यासाठी मुख्यमंत्री वयोश्री योजना राबविली जात आहे. या योजनेअंतर्गत ज्येष्ठ नागरिकांना चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड, स्टिक, व्हीलचेअर, फोल्डिंग वॉकर,कमोड खुर्ची,नी–ब्रेस,लंबर बेल्ट व सर्वाइकल कॉलर यांसारखी सहाय्य साधने खरेदी करण्यासाठी एकरकमी ३००० रुपये मर्यादेपर्यंतचा निधी वितरीत केला जातो. योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांचे वय दिनांक ३१ डिसेंबर २०२३ रोजी ६५ वर्ष पूर्ण झालेले असावे व कौटुंबिक वार्षिक उत्पन्न दोन लाख रुपयांच्या आत असणे आवश्यक आहे. जिल्ह्यात या योजनेत पात्र ठरलेल्या १७ हजार ९७५ लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण अपूर्ण असल्यामुळे त्यांच्या खात्यात निधी जमा करण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे ३० एप्रिलपर्यंत विशेष आधार प्रमाणीकरण मोहिम राबविण्यात येणार आहे.

# बालविवाह रोखण्यासाठी महिला, बालविकास विभाग अलर्ट मोडवर

### दोन वर्षात प्रशासनाने ११९ बालविवाह रोखले



आरंभ मराठी । धाराशिव

सध्या लग्नसराई जोरात सुरू असून, याच काळात बालविवाह रोखण्यासाठी महिला आणि बालविकास विभाग देखील अलर्ट मोडवर असल्याचे दिसत आहे. मागील दोन वर्षात या विभागाने धाराशिव जिल्ह्यात तब्बल ११९ बालविवाह रोखण्यात यश मिळवले आहे. तर एका प्रकरणात एफआयआर देखील दाखल करण्यात आला आहे. अक्षय तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर लग्नाच्या तारखा मोठ्या प्रमाणावर असतात. याच काळात गुपचूप बालविवाह करण्याचे प्रयत्न केले जातात. या काळात बालविवाह करण्याचा कोणी प्रयत्न केला तर त्यांच्यावर थेट कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दिले आहेत.

बालविवाह रोखण्यासाठी धाराशिव जिल्हा प्रशासनाने ॲक्शन प्लॅन तयार केला आहे. यात ग्रामीण भागातील बालविवाह रोखण्याची जबाबदारी ग्रामविकास अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. तर शहरी भागासाठी बाल विकास प्रकल्प अधिकारी यांची बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

बालविवाहात सहभागी होणारे व सहकार्य करणारे व्यक्ती, धार्मिक गुरु, पंडित, सेवा देणारे व्यावसायिक, मंडप मालक, फोटोग्राफर, केटरिंग व्यावसायिक, लॉन्स मालक आणि वाजंत्री यांच्यावरही बालविवाह प्रकरणात कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे लग्न समारंभातील व्यावसायिकांना नवरा–नवरीचे वय तपासून ऑर्डर घ्यावी लागणार आहे.

### टोल फ्री नंबरवर करा फोन

नागरिकांनी आपल्या आजूबाजूला होत असलेला बालविवाह रोखण्यासाठी चाइल्ड हेल्पलाइन हा टोल फ्री क्रमांक १०९८ अथवा ११२ यावर फोन करून माहिती द्यायची आहे. कारवाई दरम्यान ही माहिती कोणी दिली त्याचे नाव गोपनीय ठेवले जाणार आहे.

### दोन वर्षात ११९ बालविवाह रोखले

मागील दोन वर्षांत धाराशिव जिल्ह्यातील महिला व बालविकास विभागाने तब्बल ११९ बालविवाह रोखण्यात यश मिळवले आहे. यामध्ये एका प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या महिला व बालविकास विभाग अलर्ट मोडवर काम करत आहे. बालविवाह केल्यास बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ मधील कलम १६ (१) नुसार कारवाई करण्यात येत आहे.

## उमरगा जिल्हा परिषद हायस्कूलचे १२ विद्यार्थी पाचवी शिष्यवृत्तीसाठी पात्र



आरंभ मराठी । उमरगा

उमरगा येथील आय एस ओ मानांकित जिल्हा परिषद हायस्कूल मधील पाचवीचे १४ पैकी १२ विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र झाले आहेत. पात्र झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा केंद्रप्रमुख शिला मुदगडे, शिल्पा वळसंग, मुख्याध्यापक पद्माकर मोरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रशालेतून सर्वप्रथम साकीब हन्नुरे २२८ गुण, आयशा कबीर २२४ गुण, श्रावणी कल्लीमुळे २२२ गुण, सिमरन जमादार २२२ गुण, ज्योती राऊत २१६ गुण, जैद मुल्ला २१० गुण, भूमिका चौधरी २०६ गुण, शौर्या पाटील २०४ गुण, कृष्णा अबाचने १९० गुण, अल्पिशा बोराटे १७८ गुण, वैष्णवी वंगे १६६ गुण घेतले आहेत. गेल्या चार वर्षांत प्रशालेचे चार विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशालेतील शिक्षक संजय रुपाजी, शिल्पा चंदनशिवे, सोनाली मुसळे, वर्षाराणी पाटील यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे, सुजाता मोरे, अमर वरवटे, अशोक पतगे, शिक्षणतज्ञ सदानंद शिवदे पाटील, मुख्याध्यापक पद्माकर मोरे, गटशिक्षणाधिकारी काकासाहेब साळुंके, केंद्रप्रमुख शिला मुदगडे यांनी अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरिता उपासे प्रास्ताविक मुख्याध्यापक पद्माकर मोरे तर आभार ममता गायकवाड यांनी मानले.